**<u>ठळक बातम्या</u>**

- दावोसमध्ये झालेल्या गुंतवणुकीपैकी ९८ टक्के थेट परदेशी गुंतवणूक असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती
- नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना देशभरातून आदरांजली
- पर्यावरण आणि वनहक्क चळवळीतले ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते मोहन हिराबाई हिरालाल यांचं निधन

**आणि**

- रणजीमध्ये मुंबई, महाराष्ट्र आणि विदर्भाच्या संघाचे सामने सुरू

**<><><><><>**

स्वित्झर्लंडच्या दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचादरम्यान महाराष्ट्रानं केलेल्या सामंजस्य करारांच्या एकंदर गुंतवणुकीपैकी ९८ टक्के गुंतवणूक ही थेट परदेशी गुंतवणुकीच्या स्वरूपात असून यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते दावोस इथून वार्ताहर परिषदेत बोलत होते. या परिषदेदरम्यान महाराष्ट्रानं एकंदर ६१ सामंजस्य करार केले असून त्यामुळे १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात होणार असल्याची माहिती यात गुंतवणुकीसाठीचे ५४, तर उर्वरित ७ धोरणात्मक सामंजस्य करार असल्याचं त्यांनी सांगितलं. संपूर्ण जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन उत्सुकतेचा, किंबहुना विश्वासाचा आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

दावोसमध्ये झालेल्या सामंजस्य करारातल्या २९ पैकी २८ कंपन्या भारतातल्या आहेत. २८ पैकी २० राज्यातल्या असताना दावोस दौरा कशासाठी असा सवाल विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. २० पैकी १५ मुंबईतल्या, ४ पुण्यातल्या, एक ठाण्यातली आहे, असंही ते म्हणाले. त्याचवेळी गेल्यावर्षी झालेल्या सामंजस्य करारापैकी किती अंमलात आले याची माहिती देण्याचं आवाहन त्यांनी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्र्यांना केलं आहे.

दावोसमध्ये सर्व गुंतवणूकदार एकत्र येतात, त्यामुळं इथे येणं आवश्यक असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर दिली आहे.

**होल्ड बाइट - देवेंद्र फडणवीस**

**<><><><><>**

नवीन जिल्हे तयार करण्याचा कुठलाही प्रस्ताव राज्य सरकारकडे आलेला नाही. जनगणनेनंतर यासंदर्भातला निर्णय होऊ शकतो, असं स्पष्टीकरण महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिलं. ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. अनेक ठिकाणी नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय तयार केलं जाईल, असं ते म्हणाले.

प्रत्येक आदिवासी पाड्यावर महिन्यातले काही दिवस अधिका-यांनी स्वतः प्रत्यक्ष जावं, पारधी समाजासारखे लाभार्थी जर शासनापर्यंत पोहोचू शकत नसतील तर संबंधित विभागानं त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांना न्याय देणं अभिप्रेत आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पुणे शहरात सध्या गुईलेन-बॅरे सिंड्रोम या आजारानं डोकं वर काढलं आहे, मात्र हा संसर्गजन्य आजार नाही, त्यामुळं नागरिकांनी घाबरुन जाऊ नये, असं आवाहन उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार आज केलं. याबाबतच्या  आढावा बैठकीनंतर ते बोलत होते. गुईलेन-बॅरे सिंड्रोम आजाराची लागण झालेल्यांची संख्या आता ५९ झाली आहे.

**<><><><><>**

भारतीय कृषि व्यवस्था हळूहळू उच्च दर्जाच्या कृषि उत्पादनातून जागतिकीकरणाकडे जात असल्याचं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते आज परभणीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठाच्या २६ व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. स्वातंत्र्यानंतर अन्नधान्य आयात करणाऱ्या देशाची भूक भागवून सध्या देश कृषि उत्पादन निर्यातीमध्ये जगात अग्रेसर ठरत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

एसटी बसस्थानकांची स्वच्छता ही कर्मचारी आणि प्रवाशांची संयुक्त जबाबदारी असून, या अभियानाच्या माध्यमातून एसटीची सर्व बसस्थानकं सुंदर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आज म्हणाले. मुंबईत कुर्ला नेहरूनगर बसस्थानकावर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानाचा प्रारंभ त्यांनी केला, त्यावेळी ते बोलत होते. या अभियानाच्या बोधचिन्हाचं अनावरणही यावेळी त्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली अर्पण केली. नेताजींचा जन्मदिवस पराक्रम दिवस म्हणून साजरा केला जात आहे. नेताजी, स्वातंत्र्यलढ्यातल्या सर्वात प्रेरणादायी नेत्यांपैकी एक होते, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

नेताजींचं समर्पण आणि आझाद हिंद फौजेची निर्मिती हा त्यांच्या शौर्याचा पुरावा आहे असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले. तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांचं स्वातंत्रलढ्यातील योगदान अतुलनीय आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये प्रधानमंत्र्यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला अभिवादन केलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस यांना आदरांजली वाहिली.

दरम्यान, सांस्कृतिक मंत्रालयानं नेताजींच्या जन्मस्थानी ओडिशातल्या कटक इथं तीन दिवसांचा उत्सव आयोजित केला आहे.

शिवसेनेचे संस्थापक **बाळासाहेब ठाकरे** यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली अर्पण केली. बाळासाहेब ठाकरे त्यांच्या लोककल्याण आणि महाराष्ट्राच्या विकासासाठीच्या वचनबद्धतेबद्दल ओळखले जातात, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**राज्यपाल** सी. पी. राधाकृष्णन यांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित्त राजभवन इथं आदरांजली वाहिली.

मुंबई इथं मंत्रालयात पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली.

**<><><><><>**

पर्यावरण आणि वनहक्क चळवळीतले ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते मोहन हिराबाई हिरालाल यांचं काल मध्यरात्रीच्या सुमाराला नागपूरमधे निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते.

हिरालाल यांच्यावर महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांच्या पुढाकारानं गडचिरोली जिल्ह्यातलं मेंढा – लेखा गाव सर्वसहभागानं कारभार करणारं गाव म्हणून आकाराला आलं. २००९ मधे सरकारकडून सामुदायिक वनहक्क मिळालेलं ते पहिलं गाव ठरलं. त्यांना जमनालाल बजाज पुरस्कारासह अनेक सन्मान मिळाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश आणि इतर मान्यवरांनी हिरालाल यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ कवी, लेखक अनिल सोनार यांचं आज धुळे इथं निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर शहरातल्या स्मशानभूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. सोनार यांची २१ नाटकं, तीन कादंबऱ्या, सहा काव्य संग्रह, ३८ एकांकिका, एक आस्वादक समीक्षापर लेख संग्रह, एक विनोदी लेख संग्रह, पाच बालकथा संग्रह, दोन एकांकिका, एक हिंदी नाटक, दोन कथा संग्रह इतकं साहित्य प्रकाशित आहे.

**<><><><><>**

अटल भूजल योजनेअंतर्गत भूजल व्यवस्थापनामध्ये राज्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहा ‘जल योद्ध्यांना’ प्रजासत्ताक दिन सोहळ्यात विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आलं आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे सहसंचालक डॉ. प्रवीण कथने यांनी वृत्तसंस्थेला ही माहिती दिली. त्यात पुणे जिल्ह्यातल्या काऱ्हाटी गावच्या दिपाली लोणकर, अमरावती जिल्ह्यातल्या, जरुडी इथले सुधार मानकर, सातारा जिल्ह्यातल्या किरकसालचे अमोल काटकर, धाराशिव जिल्ह्यातल्या खेडचे सुनील गरड, सांगली जिल्ह्यातल्या नानगोलेच्या छाया कोळेकर, आणि लातूर जिल्ह्यातल्या हरांगूलच्या शीतल झुंजारे, यांचा समावेश आहे.

**प्रजासत्ताक दिनाच्या** मुख्य सोहळ्यात नवी दिल्लीत मूळच्या **बीड** जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यातल्या देवडी इथल्या फ्लाईंग ऑफीसर दामिनी देशमुख या परेड कमांडर म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. ध्वजारोहणानंतर ध्वजावर पुष्पवृष्टी करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत नाशिक इथं सुरु झालेल्या बडोद्याविरुद्धच्या सामन्यात महाराष्ट्रानं पहिल्या डावात दिवसअखेर ७ गडी गमावून २५८ धावा केल्या. आजचा खेळ थांबला तेव्हा सौरभ नवले ६०, तर रजनीश गुरबानी २२ धावांवर खेळत होता. सिद्धेश वीरनं ४८, तर यश क्षीरसागरनं ३० धावा केल्या. बडोद्यातर्फे अतित शेठनं ३, तर राज लिंबानीनं २ बळी मिळवले.

मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलातल्या शरद पवार क्रिकेट अकादमीत आज सुरु झालेल्या सामन्यात दिवसअखेर जम्मू-कश्मीरनं पहिल्या डावात मुंबईवर ५४ धावांची आघाडी घेतली.

जयपूर इथं विदर्भ आणि राजस्थान याच्यात सुरु असलेल्या सामन्यात विदर्भाचा पहिला डाव १६५ धावांवर संपुष्टात आला. राजस्थानतर्फे खलिल अहमदनं ५ बळी मिळवले. त्यानंतर फलंदाजीला उतरलेल्या राजस्थाननं दिवसअखेर ५ गडी गमावून १०१ धावा केल्या. ते ६४ धावांनी पिछाडीवर आहेत.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.